# शोषणाविरुद्ध विद्रोह करणारी प्रज्ञा दया पवार यांची कविता

**डॉ. मनीषा झोंबाडे**
सहा. प्राध्यापिका व मराठी विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, मुरुड. ता.जि. लातूर

मराठी कवितेमधलं एक महत्त्वाचं नाव म्हणजे प्रज्ञा पवार हे होय. दलित कवितेच्या तिसऱ्या पिढीमधील महत्त्वाच्या कवयित्री. 'अंत:स्थ', 'उत्कट', जीवघेण्या धगीवर', 'मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा', 'आरपार लयीत प्राणांतिक', 'दृश्यांचा ढोबळ समुद्र' हे त्यांचे पाच कवितासंग्रह आहेत. हे सर्व कवितासंग्रह वास्तववादी दृष्टिकोनातून निर्माण झाले असल्याचे दिसून येतात.

स्त्री अभिव्यक्तीची जाणीव, वास्तवाचे अचूक दर्शन, विद्रोही लेखन इत्यादी प्रज्ञा पवार यांच्या काव्याची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये आहेत.

प्रज्ञा पवार यांचा पहिला दलित कवितासंग्रह 'अंत:स्थ' हा दलित कवितेला नवे वळण देणारा कवितासंग्रह असल्याचे दिसून येते. आत्तापर्यंत दलित कविता ज्या मर्यादेमध्ये होती, ज्या वर्तुळामध्ये तिचे विश्व होते, त्या दलित कवितेने मर्यादेची वर्तुळ झुगारून एक नवा मार्ग स्वीकारल्याचा दिसतो तो 'अंत:स्थ' या कवितासंग्रहामधील कवितांमधून.

'नवा कोरा अस्खलित जन्म' ही त्यांची कविता प्रामुख्याने गुलामगिरी व शोषणाविरुद्ध विद्रोह करणारी कविता आहे. ही कविता स्त्री अस्तित्वाची जाणीव प्रकट करून देते. प्राचीन काळापासून स्त्री गुलामगिरीच्या विळख्यात अडकलेली होती.केवळ चूल आणि मूल यामध्येच तिचे विश्व होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले व सावित्रीबाई या महान व्यक्तींनी दलितांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. त्यामुळे तळागाळातील दलित स्त्रिया शिकल्या. शिक्षणामुळे त्यांच्यात आत्मसन्मान निर्माण झाला. त्यांना आपल्या अस्तित्वाची जाणीव झाली. शैक्षणिक क्रांतीमुळे विचार परिवर्तन घडले. हजारो वर्ष गुलामगिरीच्या विळख्यात अडकलेली दलित स्त्री अनेक अर्थाने मुक्त झाली. दलित स्त्री कितीही शिकली, सवरली तरी जीवन जगताना तिला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. समाजात पावलोपावली तिच्यावर अन्याय-अत्याचार होत असतात. हा अन्याय अत्याचार प्रज्ञा पवार यांना अगदी निकटत्वाने दिसतो. म्हणूनच त्यांनी स्त्रियांवरील अन्याय अत्याचार थांबेल का? असा प्रश्न आपल्या काव्या द्वारे विचारला आहे. स्त्रियांना गुलामीतून बाहेर काढणे अतिशय गरजेची आहे. ही जाण प्रज्ञा पवार यांना असल्यामुळे त्यांनी शब्दरुपी शस्त्र वापरले. त्यांच्या काव्य निर्मितीचा एकमेव हेतू केवळ स्त्रियांची अन्यायातून मुक्ती करणे हा असल्याचे दिसते.

स्त्रियांवरील अन्याय अत्याचार दूर होण्यासाठी प्रज्ञा पवार यांनी आपल्या काव्यातून अतिशय परखडपणे विचार मांडले आहेत. प्रज्ञा पवार यांनी त्यांच्या काव्यातून कठोर शब्दाने समाजावर टीका केली, तरीही या समाजातील स्त्रियांवरती होणारे अन्याय अत्याचार थांबले नाहीत. ते सातत्याने सुरू होते. या अन्याय अत्याचाराला कारणीभूत होती केवळ सामाजिक परिस्थिती. दलित स्त्री जीवनात निर्माण होणारी दु:ख ही काही आजची दु:खे नाहीत तर ती अनादी काळापासून परंपरेने चालत आलेली आहेत. हा विचार प्रज्ञा पवार यांनी आपल्या काव्यातून मांडला आहे. प्रज्ञा पवार यांनी या कवितेमध्ये स्त्री पुरुष समानतेविषयी ही देखील मत व्यक्त केले आहे ते मत अतिशय महत्वपूर्ण असे आहे.

मानवाचं नातं दृढ होण्यासाठी स्त्री पुरुष हे समान असावेत. त्यांच्या कवितेमध्ये कुठेही लिंगभेद आढळून येत नाही. स्त्री-पुरुष यांना त्या समान लेखतात. स्त्री आणि पुरुषाचं नातं टिकून राहावं असं त्यांना वाटतं. मग ते नाते वडील असो, पती असो व प्रियकर असो. त्या नात्यांमध्ये कुठेही वैचारिक भेद नसावा.

प्रज्ञा पवार यांच्या काव्यातून स्त्रियांचा परंपरेने केलेला छळ दिसतो. स्त्रियांना गावकुसाबाहेर ठेवणे, त्यांच्यावर जुलूम करणे, अशा कितीतरी जीव घेण्या प्रसंगांना दलित स्त्रिया सामोरे जाताना दिसतात. कित्येक वर्ष गेली तरी स्त्रियांना गावकुसाबाहेरचे जीवन जगावे लागते. स्त्रियांना येसकारा सारखी गावकऱ्यांची कामे आजही करावी लागतात. असे कितीतरी महत्त्वपूर्ण विचार आपल्या काव्यातून प्रज्ञा पवार यांनी मांडले आहेत. आजही हा समाज दलित स्त्रीला सशक्त न बनविता कुपोषित बनवतो आहे. दलित स्त्रियांचे पूर्वज जे व्यवसाय करत होते तेच व्यवसाय आजच्या पिढीतील स्त्रियांच्या वाट्याला आलेले आहेत. ही खंत प्रज्ञा पवार यांनी आपल्या काव्यातून व्यक्त केली आहे. ही खंत व्यक्त करताना कवयित्रीने चाऱ्या, डल्या, गुडसा ढोलक, संबळ आशा प्रतिकांचा वापर केला आहे. दलित स्त्रियांवर होणारा अन्याय अत्याचार, त्यांच्या वाटेला आलेले काम, गरिबी, दारिद्याची भावना इत्यादी स्त्री दु:ख त्यांच्या कवितेत दिसून येतात.

दलित स्त्रीला जन्मजातच एक शाप आहे. अशी त्यांची वैचारिकता काव्यात दिसून येते. दलित उपेक्षित स्त्रियांना कितीतरी अन्याय अत्याचाराला बळी पडावे लागते. हे सत्य त्यांनी त्यांच्या काव्यातून मांडले आहे.

प्रज्ञा पवार यांच्या मते, जन्मापासून ते मृत्यूपर्यंत स्त्रियांच्या आयुष्यात फक्त दु:खच आहे. परंतु आज दलित स्त्रियांच्या बाबतीत झालेले सामाजिक परिवर्तन तितक्याच उत्सुकतेने दर्शविले आहे. दलित स्त्रिया शिकल्या. त्यांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव झाली. ज्या काळात दलित स्त्रियांच्या घरामध्ये अन्न खायला भांडी नसायची, जातिवादाचे तीव्र चटके सहन करावे लागायचे. पण आता मात्र दलित स्त्रियांची किती प्रगती झाली आहे, हे या काव्यातून प्रज्ञा पवार यांनी अतिशय उत्साहीपणे सांगितले आहे. त्यांच्या काव्यातील दलित स्त्री यशाच्या शिखरापर्यंत पोहोचली आहे. एकेकाळी ज्या दलित स्त्रियांना अन्न मिळत नव्हते, खायला भांडी सुद्धा नव्हती अशा स्त्रियांची घर आज गच्च वस्तूंनी भरलेली आहेत . त्या वस्तू ठेवण्यासाठी घरात जागाही पुरत नाही. हे प्रज्ञा पवार यांनी पुढील ओळीतून सांगितले आहे,

*" गच्च वस्तूंनी मध्यमवर्गीय गरजांनी लदबदलेलं घर*
*समष्टीचं क्रूर जाळ आत बाहेर*
*नवरा मुलगा प्रियतम*
*जिवलग सोयरे सकळ*
*सुरक्षिततेची बेहद्द नशीली झिंग "*

आज दलित स्त्रियांच्या घरामध्ये सर्व वस्तू उपलब्ध आहेत. आज दलित स्त्री सुखी व समाधानी जीवन जगू लागली आहे. तिचा नवरा मुलगा प्रियकर सर्वच काही तिच्यासोबत आहेत. तरीही स्त्रीला तिच्या अस्तित्वाची तिच्या सुरक्षिततेची भीती वाटते. सर्व नातीगोती जरी जवळ असले तरी समाजातील स्त्रीलंपट, क्रूर लोकांची भीती ने आजची स्त्री झुरते आहे असे त्यांनी या कवितेत म्हटले आहे. एकंदरीतच प्रज्ञा पवार यांना आजच्या स्त्रीच्या सुरक्षिततेची चिंता असल्याचे दिसून येते. समाजातील वास्तव अतिशय निर्भीडपणे प्रज्ञा पवार यांनी या कवितेच्या माध्यमातून मांडले आहे.

*" मेंदूतल्या शुभ्रवळ्यांना जुगारणाऱ्या*
*गुलाम शरीराला हवाय*
*नवा कोरा अस्खलित जन्म "*

समाजातील वाईट प्रवृत्तीच्या लोकांपासून आजची दलित स्त्री दूर जाऊ इच्छिते. स्त्री म्हणजे फक्त उपभोगाची वस्तू या भावनेने समाज तिच्याकडे पाहतो. स्त्रीला स्वतःचे अस्तित्व नाही. अशा या समाजापासून स्त्रीला नवा जन्म पाहिजे आहे. दलित समाजातील सर्व स्त्रियांचे प्रतिनिधित्व या कवितेतून प्रज्ञा पवार करत आहेत. अन्याय, अत्याचार, गरिबी आणि दारिद्याला

कंटाळून गेलेली स्त्री प्रकाशाच्या विश्वात प्रवेश करू इच्छिते. दलित स्त्रीला बुरसटलेल्या विचारांच्या लोकांपासून दूर जाऊन एक नवीन जीवन जगायचे आहे. ज्या जीवनामध्ये तिला स्वतंत्र्य असेल, सन्मान असेल, खरेखुरे प्रेम मिळेल. नवविचारांच्या समाज माणसांमध्ये ती आपले जीवन व्यतीत करू इच्छिते. म्हणून तिला नवा कोरा अस्खलित जन्म घ्यायचा आहे. असे दलित स्त्रियांचे भावविश्व प्रज्ञा दया पवार यांनी आपल्या काव्यातून मांडले आहे.

प्रज्ञा पवार यांच्या निवडक कवितेचा अभ्यास केल्यानंतर पुढील निष्कर्ष दिसून येतात.

1. दलित कविता अन्याय, अत्याचार, दु:ख, दारिद्य अशा मर्यादेमध्ये होती. परंतु ती मर्यादा ओलांडून दलित कवितेने एक नवा मार्ग स्वीकारल्याचे दिसून येते.
2. प्रज्ञा पवार यांच्या कवितेतील दलित स्त्री लाचारी, गुलामगिरी पासून मुक्त होऊन स्वाभिमानी व स्वातंत्र्य जीवन जगत असल्याचे दिसून येते.
3. समाजामध्ये कितीही वैचारिक परिवर्तन झाले तरी आजच्या दलित स्त्रीला समाजाबद्दल वाटणारी भीती व घृणा प्रज्ञा पवार यांच्या कवितेतून स्पष्ट दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ**

1.पवार प्रज्ञा, अंत:स्थ (कवितासंग्रह, १९९३, मानसन्मान प्रकाशन, पुणे, २००४), डिंपल प्रकाशन, मुंबई

2.पवार प्रज्ञा, अफवा खरी ठरावी म्हणून (कथासंग्रह) (२०१०), शब्द पब्लिकेशन्स, मुंबई

3.पवार प्रज्ञा, अर्वाचीन आरण (संमिश्र गद्यलेख, २०२०), शब्द पब्लिकेशन्स, मुंबई

4.पवार प्रज्ञा, आरपार लयीत प्राणांतिक (दीर्घकविता) (२००९, २०१०), लोकवाङ्मय गृह, मुंबई

5.पवार प्रज्ञा, उत्कट जीवघेण्या धगीवर (कवितासंग्रह,२००२), लोकवाङ्मय गृह, मुंबई.